नि.दि.दावा. क्र. ३४/२०११.
जयजयराम व इतर वि. कमळाबाई व इतर.
MHKO150001622011.

## निशाणी क्रमांक २२० व २२१ वरील एकत्रीत आदेश.

**१.** वादींनी नि. क्र. २२० वरील अर्ज मयत प्रतिवादी क्र.१ च्या विरोधात झालेला अवसानाचा आदेश रद्द करण्यासाठी आणि नि. क्र.२२१ चा अर्ज तिच्या वारसांना पटलावरती घेण्यास झालेला विलंब माफ करून पटलावरील प्रतिवादी क्र. २ ते ४ हे तिचे वारस असल्याची नोंद घेण्यासाठी दाखल केलेले आहेत. न्यायाच्या दृष्टीने चर्चेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सर्व अर्ज एकत्रीतपणे आदेशासाठी घेतलेले आहेत.

**२.** वादींचे थोडक्यात कथन की, दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.१ चे दि. ०६.०४.२०२५ रोजी निधन झालेले असून, प्रतिवादी क्र. २ ते ४ हे तिचे कायदेशीर वारस असून पटलावरती दाखल आहेत. सबब, न्यायाच्या दृष्टीने तिच्या विरोधात झालेला अवसानाचा आदेश रद्द करून प्रतिवादी क्र. २ ते ४ यांना तिचे वारस असल्याची नोंद करण्याबाबत परवानगी देण्याची विनंती केली आहे. प्रतिवादीतर्फे अर्ज मुदतीत नसून योग्य कारण दिलेले नसल्यामुळे नामंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

**३**. वादी व प्रतिवादींच्या वकिलांचा विस्तृत युक्तिवाद ऐकला. वादींच्या वकिलांनी प्रस्तूत अर्जाद्वारे वादींनी केलेली मागणी दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयास उपयुक्त असून मूळ दाव्यामध्ये कोणताही बदल होत नसल्याने न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादींच्या वकिलांनी प्रस्तूतचे अर्ज वादींनी विलंबाने दाखल असून त्याचे कोणतेही संयुक्तिक कारण दिले नसल्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**४**. वादींच्या कथना प्रमाणे प्रतिवादी क्र.१ च्या निधनानंतर तिच्या वारसांबाबत पटलावरती नोंद घेण्यास चार महिने पंधरा दिवसांचा विलंब झालेला आहे. वादींनी विलंबाचे योग्य कारण दिलेले नाही. त्यांनी केवळ त्यांना कायदयाचे ज्ञान नसल्याचे कथन केलेले आहे. प्रतिवादी क्र. ३ ने दि. १३.११.२०२५ रोजी पुरसिस देवून

प्रतिवादी क्र. १ मयत झाल्याचे प्रथम न्यायालयास कळवलेले आहे. सबब, मयत प्रतिवादी क्र. १ विरोधात अवसानाचा आदेश झालेला नाही. प्रस्तुत दावा हा वाटपासह निरंतर मनाई हुकुमासाठी असून वादी व प्रतिवादींच्या अंतिम आदेशाप्रमाणे येणा-या हिश्यामध्ये बदल करणारे आहेत. सबब, दाव्याचे स्वरुप विचारात घेता, न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या बाबींचा विचार करता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मयत प्रतिवादी क्र. १ च्या विरोधात झालेला कथीत अवसानाचा आदेश रद्द करण्यात येतो.

३. वादींनी प्रतिवादी क्र.१ च्या वारसांबाबत दाव्यात आवश्यक ती नोंद घेण्यास परवानगी देण्यात येते.

४. वादी व प्रतिवादींनी आदेशाची नोंद घेऊन पुर्तता करावी.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

जे. ओ. कोड-एम.एच.०२८९७

दिनांक – २१.११.२०२५. वाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.